**ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आरक्षण सोडत कार्यक्रम**

**१.**माहे जानेवारी २०२१ ते एप्रिल २०२२ मध्ये मुदत संपलेल्या सुमारे १९९३ ग्रामपंचायती तसेच माहे मे २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे ७६३८ ग्रामपंचायती तसेच

**२.** आयोगाने दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेल्या प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रमातील निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या सर्व ग्रामपंचायती व नव्याने स्थापित सुमारे १०१ ग्रामपंचायती

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/ग्रापंनि २०२०/प्र.क्र.४/का.८
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० मे, २०२२

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतींच्या मुदत संपण्यापूर्वी निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

आणि ज्याअर्थी, मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (सिव्हील) १९७५६/२०२१ मध्ये दिनांक ४ मे, २०२२ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन आयोगाने दिनांक ०६ मे, २०२२ च्या आदेशान्वये **माहे जानेवारी २०२१ ते एप्रिल २०२२ मध्ये मुदत संपलेल्या सुमारे १९४४ ग्रामपंचायती व माहे मे २०२२ ते डिसेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या सुमारे ७७७६ ग्रामपंचायती तसेच नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायती, आयोगाने प्रभाग रचना व आरक्षणाबाबत दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेला कार्यक्रम योग्यरित्या न राबविल्यामुळे संपूर्ण निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या** ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभागाच्या सीमा निश्चित करण्यासाठी कार्यक्रम देण्यात आला होता. त्यानुसार दिनांक २७/०५/२०२२ रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर आदेशात असेही नमूद केले आहे की, जोपर्यंत राज्य शासन त्रिस्तरीय चाचणी पूर्ण करीत नाही, तोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवता येणार नाहीत.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी यांच्याकडी प्राप्त अहवाल विचारात घेता, अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द झालेल्या ग्रामपंचायतींसाठी कायद्यातील तरतुदीनुसार तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशातील निर्णयानुसार आरक्षण ठरविण्याचा कार्यक्रम देणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १० अ (४) नुसार मिळालेल्या व इतर अधिकारांचा वापर करुन, आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याच्या तत्वानुसार खालील ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता आरक्षण सोडत काढण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

i) **माहे जानेवारी २०२१ ते एप्रिल २०२२ मध्ये मुदत संपलेल्या सुमारे १९९३ ग्रामपंचायती तसेच माहे मे २०२२ ते डिसेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या सुमारे ७६३८ ग्रामपंचायती,**

ii) **आयोगाने प्रभाग रचना व आरक्षणाबाबत दि. २९/११/२०१९ रोजी दिलेला कार्यक्रम योग्यरित्या न राबविल्यामुळे संपूर्ण निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या ग्रामपंचायती तसेच नव्याने स्थापित झालेल्या सुमारे १०१ ग्रामपंचायती**

## आदेश

१. ग्रामपंचायतींच्या सर्व निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असल्याने, त्यांनी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेऊन निवडणुका योग्यप्रकारे पार पाडाव्यात.

२. **ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण ) आदेश २०२१, दिनांक २४/११/२०२१ मध्ये प्रभाग रचना व आरक्षण करण्याची सविस्तर कार्यपध्दती नमूद केलेली आहे.** सदर प्रभाग रचना व आरक्षण आदेशामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १५/१२/२०२१ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने अंशत: सुधारणा करुन दिनांक २९/१२/२०२१ रोजी अंशत: सुधारीत आदेश क्र.१ निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपील (सी) क्र.१९७५६/२०२१ मध्ये दि.१९ जानेवारी, २०२२ रोजी आदेशित केल्यानुसार आयोगाच्या दिनांक २४/११/२०२१ च्या प्रभाग रचना व आरक्षण आदेशामध्ये अंशत: सुधारणा

करुन प्रभागांच्या सीमा निश्चित करुन त्यानंतर आरक्षण निश्चिती करण्याच्या अनुषंगाने दिनांक २७/०१/२०२२ रोजी अंशत: सुधारीत आदेश क्र.२ निर्गमित करण्यात आले आहेत. **त्यानुसार योग्य ते बदल करण्यात यावेत.**

३. आयोगाने दिनांक २४/११/२०२१ रोजी दिलेल्या आदेशातील मुद्दा क्र. ११ व १२ नुसार ( मुद्दा क्र. ८ व ९.४ वगळून )आरक्षणाची सोडत काढण्याची प्रक्रिया राबविण्यात यावी.

४. आरक्षण सोडतीचा कार्यक्रम सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** नुसार पार पाडण्यात यावा. अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला व सर्वसाधारण महिला यांच्याकरीता आरक्षित जागा निश्चित करण्याकरीता सोडतीचा कार्यक्रम राबविण्यात यावा. या कार्यक्रमानुसार प्रभाग निहाय आरक्षण सोबतच्या **परिशिष्ट १** (प्रारुप अधिसूचना)नुसार जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने प्रसिध्द करण्यात यावे.

**५. परिशिष्ट १** नुसार प्रारुप अधिसूचना व अनुसूची यास व्यापक प्रसिध्दी देण्याची जबाबदारी सबंधित तहसिलदार यांची असेल.

६. विशेष ग्रामसभेत आरक्षण सोडतीअंती आरक्षणावर हरकती व सूचना मागविण्यात याव्यात. प्राप्त हरकती विचारात घेऊन उपविभागीय अधिकारी यांनी अभिप्राय द्यावेत. उपविभागीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन जिल्हाधिकारी यांनी सोबतच्या **परिशिष्ट २ ( अंतिम अधिसूचना )** नुसार आरक्षण अधिसूचनेस अंतिम मान्यता द्यावी.

**७. परिशिष्ट २** नुसार अंतिम अधिसूचना व अनुसूची यास व्यापक प्रसिध्दी देण्याची जबाबदारी सबंधित तहसिलदार यांची असेल.

८. उक्त कार्यक्रमानुसार प्रत्येक टप्प्यावरील अहवाल राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करावा. उक्त सर्व आदेशातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार तसेच इतर संबंधितांनी घ्यावी.

सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** नुसार प्रभागाच्या आरक्षणाचा कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**सहपत्र - परिशिष्ट अ, परिशिष्ट १ व परिशिष्ट २**

प्रती -

१.प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन.

**उक्त कालावधीतील ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसंदर्भात अनुदानाची पर्याप्त तरतूद (मागील अनुदानाच्या थकबाकीसह) करण्याबाबत आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही सत्वर करावी. तसेच या पत्रात निर्देश दिल्यानुसार ग्रामसेवकासह संबंधित गटविकास अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.) जिल्हा परिषद यांची सक्रिय भूमिका व जबाबदारी राहील, याबाबतचे निर्देश देणारे पत्र आपणाकडून तातडीने निर्गमित करण्यात यावे.**

२.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.

३.विभागीय आयुक्त (सर्व),

४.**जिल्हाधिकारी सर्व (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)**

५. **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)**

६.माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

७.सर्व निवडणूक कार्यासने

८.निवड नस्ती.

## परिशिष्ट अ

**आयोगाचे क्रमांक - रानिआ/ग्रापंनि २०२०/प्र.क्र. ४ /का.०८, दि. ३०/०५/२०२२ रोजीच्या आदेशासोबतचे सहपत्र**

**माहे जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, आयोगाने दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेल्या प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रमातील निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या ग्रामपंचायती तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम.**

| आरक्षणाची सोडत | कार्यवाही पूर्ण करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|
| i) विशेष ग्रामसभेची सूचना देणे ( आरक्षणाची सोडत काढण्याकरीता ) | ०३/०६/२०२२ |
| ii) विशेष ग्रामसभा बोलवून, तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली,प्रारुप प्रभाग रचनेवर आरक्षणाची सोडत काढणे ( अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, व सर्वसाधारण महिला) | ०६/०६/२०२२ |
| iii) सोडतीनंतर प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करणे | ०७/०६/२०२२ |
| iv) प्रभागनिहाय आरक्षण निश्चितीबाबत हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | ०७/०६/२०२२ ते १०/०६/२०२२ |
| v) उपविभागीय अधिकारी यांनी प्राप्त हरकती विचारात घेऊन अभिप्राय देणे | १५/०६/२०२२ |
| vi) उपविभागीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन अंतिम अधिसूचनेस (नमुना अ) जिल्हाधिकारी यांनी मान्यता देणे | १७/०६/२०२२ |
| vii) जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभाग रचनेला (नमुना अ) व्यापक प्रसिध्दी देणे | २०/०६/२०२२ |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## परिशिष्ट – १

**(परिच्छेद क्र. ११.८.१)**

## प्रारूप प्रभाग रचनेची नोटिस व माहितीचा तक्ता

**(नियम ५ (२) पहा)**

# नोटीस

मी, --------------------, राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) नियम, १९६६ याच्या नियम ५(२) अनुसार अधिसूचनेचा पुढील मसुदा गावातील सर्व नागरिकांच्या माहीतीसाठी याद्वारे प्रसिध्द करीत आहे व याद्वारे अशी नोटीस देत आहे की, उक्त अधिसूचनेच्या मसुद्याच्या संबंधात गावातील कोणत्याही व्यक्तीने आक्षेप किंवा सूचना दि.---------- पूर्वी दाखल केल्यास,त्या आक्षेप व सूचनांचा विचार केला जाईल.

## प्रारुप अधिसूचना

क्रमांक ----------

मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) १९६६ याच्या नियम ५(१) अनुसार मी ---------- राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी याद्वारे असे अधिसूचित करतो की,

(अ) ----------(नाव) ग्रामपंचायतीत ---------------- (संख्या) सदस्यांचा समावेश राहील;

(ब) सदर ग्रामंपचायतीचे ----------(संख्या) प्रभागांमध्ये विभाजन करण्यात येईल;

(क) यासोबत असलेल्या अनुसूचीच्या नमुना **'ब'** मध्ये निवडून द्यावयाची सदस्यांची संख्या ही स्तंभ ६मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक प्रभागातून निवडावयाच्या सदस्यांच्या संख्येइतकी राहील;

# अनुसूची
## नमुना 'ब'

| ग्रामपंचायत - तालुका- जिल्हा - | |
|---|---|
| लोकसंख्येनुसार निवडून द्यावयाच्या सदस्यांची एकूण संख्या | -- |
| अनुसूचित जाती | -- |
| अनुसूचित जमाती | -- |
| सर्वसाधारण | -- |
| महिलांसाठी आरक्षित जागा (एकूण जागांपैकी) | -- |
| अनुसूचित जाती महिला | -- |
| अनुसूचित जमाती महिला | -- |
| सर्वसाधारण महिला | -- |

| प्रभाग क्रमांक | प्रभागाची लोकसंख्या (लगतच्या जनगणनेनुसार) | | | प्रभागाची व्याप्ती/ विस्तार | प्रभागनिहाय सदस्य संख्या | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | अ.जा | अ.ज. | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

गट विकास अधिकारी     तहसिलदार     उपविभागीय अधिकारी     जिल्हाधिकारी

दिनांक

## परिशिष्ट २

(परिच्छेद क्र. १३.१)

## नमूना ‘अ ’ (अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना व माहितीचा तक्ता)

**(नियम ५ (१) पहा)**

# अधिसूचना

क्रमांक ---------------------

मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) १९६६ याच्या नियम ५ (१) अनुसार मी ------------ राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी याद्वारे असे अधिसूचित करतो की,

(अ)----------(नाव) ग्रामपंचायतीत --------------(संख्या) सदस्यांचा समावेश राहील;

(ब) सदर ग्रामपंचायतीचे ---------- (संख्या) प्रभागांमध्ये विभाजन करण्यात आले आहे.

(क) यासोबत असलेल्या अनुसूचीच्या नमुना **‘अ’** मध्ये निवडून द्यावयाची सदस्यांची संख्या ही स्तंभ ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक प्रभागातून निवडावयाच्या सदस्यांच्या संख्येइतकी राहील;

## नमुना ‘अ’

## अनुसूची

| ग्रामपंचायत - तालुका- जिल्हा - | |
|---|---|
| **लोकसंख्येनुसार निवडून द्यावयाच्या सदस्यांची एकूण संख्या** | -- |
| **अनुसूचित जाती** | -- |
| **अनुसूचित जमाती** | -- |
| **सर्वसाधारण** | -- |
| **महिलांसाठी आरक्षित जागा (एकूण जागांपैकी)** | -- |
| **अनुसूचित जाती महिला** | -- |
| **अनुसूचित जमाती महिला** | -- |
| **सर्वसाधारण महिला** | -- |

| प्रभाग क्रमांक | प्रभागाची लोकसंख्या (लगतच्या जनगणनेनुसार) | | | प्रभागाची व्याप्ती/ विस्तार | प्रभागनिहाय सदस्य संख्या | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | अ.जा | अ.ज. | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

गट विकास अधिकारी तहसिलदार उपविभागीय अधिकारी जिल्हाधिकारी

दिनांक